**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR. 416 004**
Phone No. 2690571, 2693643, 2693730
Controller of Exam. Office Ph.2693176] Fax No. 231&269065
B.Sc./M.Sc.Exam. Section Phone No. 0231&2609118

A+
Accredited by NACC
2014 with C.G.P.A.13.6

*Ref.No./SU/Exam./B.Sc/5506* *Date: 11/02/2016*

To,

The Principal/Chairman/Co-ordinator,
Of All Bsc Affiliated Colleges,
Shivaji University,
Kolhapur.

**Subject** – Regarding Skeletan paper & Instruction of B.Sc.-III Practical Examinations to be held in Feb/Mar 2016

Sir,

With reference to above subject I am directed to inform you that Feb/Mar 2016 Bsc Practical Examination begins from 15 th Feb 2016 Bsc – III Practical examination skeletion papers & instruction are available on University website i.e.www.unishivaji.ac.in Pls download the same & conduct the practical examinations as per university rules & regulations.

Thanking you.

Yours faithfully,

11.2.16
Dy. Registrar
(Exam)

**प्रात्यक्षिक परिक्षा फेब्रुवारी –१६ मध्ये करावयाची कार्यपध्दती :**

शासनाच्या अगरवाल समितीच्या नं. १९ **Decentralization of Examination Activities** आणि नं. १६ **Decentralized, Customized Interoperable Software rather then Centralized Solution** या बंधनकारक शिफारशीतील तरतुदीनुसार विविध परीक्षांच्या परीक्षा पध्दतीमध्ये, प्रात्यक्षिक परीक्षा पध्दतीमध्ये आणि प्रश्नप्रत्रिकांच्या स्वरुपात बदल करुन मनुष्यबळाचे नियोजन करण्याबाबत आणि प्रात्यक्षिक परीक्षांचे नियोजन महाविद्यालयीन पातळीवर करण्याबाबत विषय अधिकार मंडळांपुढे ठेवण्यात आला होता. सुधारित कार्यपध्दतीस मान्यता देण्यात आली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

अ) महाविद्यालयांची अभ्यासकमांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. महाविद्यालयांमधून नवनवीन अभ्यासकम सुरु केले जातात. मात्र त्यातील आवश्यक तेवढे शिक्षक उपलब्ध नसतात. कांही महाविद्यालयामधून तासिका तत्वावर शिक्षक असतात. त्यामुळे परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध होऊ शकत नाही. वारंवार संपर्क साधूनही परीक्षक उपलब्ध होत नाहीत. विद्यापीठ कायदयानुसार ३० दिवसांत निकाल जाहीर करण्याची शिवाजी विद्यापीठाची परंपरा यामुळे खंडित झालेली आहे. विविध अभ्यासकमांच्या प्रात्यक्षिक परीक्षा संपण्यापूर्वीच लेखी परीक्षा सुरु होतात. शिक्षक संख्या कमी झाल्यामुळे सिनिअर सुपरव्हीजन, प्रात्यक्षिक परीक्षांचे नियोजन व परीक्षण, प्रथम वर्ष परीक्षा व निकाल, लेखी परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणीचे काम इत्यादी सर्व प्रकारची कामे एकाच विषय शिक्षकाला देण्यात येत असल्यामुळे त्यांच्यापुढेही अडचणी निर्माण होतात. म्हणून गतवर्षीपासून परिक्षा मंडळाच्या ठरावानुसार गटवार महाविद्यालयांमध्ये प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन करण्यात आले. ते सर्व घटकांनी यशस्वीरीत्या पार पाडले.

ब) शासनाच्या अगरवाल समितीच्या नं. १९ **Decentralization of Examination Activities** आणि नं. १६ **Decentralized, Customized Interoperable Software rather then Centralized Solution** या बंधनकारक शिफारशीतील तरतुदीनुसार कामकाज करण्यासाठी आणि वरील अडचणी विचारात घेऊन गतवर्षीप्रमाणेच परीक्षांचे नियोजनासाठी खालील पध्दती अवलंबता येईल.

१. लिड कॉलेजचे क्लस्टर किंवा जिल्हावार क्लस्टर करण्यात येतील.
२. क्लस्टरमधील सिनिअर प्राध्यापकांस त्या त्या विषयसाठी क्लस्टरची चेअरमनशीप देता येईल.
३. त्या त्या क्लस्टरअंतर्गत असणा–या महाविद्यालयांच्या प्रात्यक्षिक परिक्षांचे नियोजन व व्यवस्थापन संबंधित महाविद्यालये चेअरमनला कळवतील. संबंधित चेअरमन त्यांचकडे उपलब्ध असणा–या क्लस्टरमधील शिक्षकांना अदलाबदलीन प्रात्यक्षिक परिक्षेसाठी पाठविण्याची व्यवस्था करतील.
४. संबंधित लिड कॉलेजला / क्लस्टरला व चेअरमनला सदर नियोजनासाठी मानधन विद्यापीठ परिक्षेस देण्यात येणा–या ॲडव्हान्सच्या रक्कमेतून देण्यात येईल.
५. संबंधित शिक्षकांचे मानधन व प्रवासभत्ता त्या त्या महाविद्यालयास देण्यात आलेल्या ॲडव्हान्समधून करण्यात येईल.

क) सर्व विद्याशाखांकडील गणित, सांख्यिकीशास्त्र इत्यादी विषयांच्या प्रात्यक्षिक परिक्षेचे प्रश्नसंच महाविद्यालयातील प्रात्यक्षिक परीक्षेच्या अध्यक्षांना मेलव्दारे पाठवून संबंधित विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था व नियोजन करावे. गतवर्षी अशा प्रकारचे नियोजन सर्व परीक्षेसाठी करण्यात आले होते व ते यशस्वीही झाले होते. सदर पध्दतीची अंमलबजावणी फेब्रुवारी –१६ मध्येही होणा–या परीक्षांसाठी करण्यात यावी.

मा. परीक्षा नियंत्रक